जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

प्रेसनोट क्रमांक - १३४३ दिनांक १३/११/२०२०

**स्वारगेट पोलीस स्टेशन**
**गावठी पिस्टल व जिवंत काडतुस विकणा-या टोळीचा पकडून**
**११ पिस्टल व ३१ जिवंत काडतुसे हस्तगत**

दिनांक ०७/११/२०२० रोजी वपोनि.ब्रम्हानंद नाईकवाडी यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक,जायभाय व स्टाफ असे पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोशि.ज्ञाना बडे व पोशि.मनोज भोकरे यांना माहिती मिळाली की,वानवडी पो.स्टे. गु.र.नं.८५०/२०२०,भा.द.वि.कलम ३०७,१२०(ब),आर्म अक्ट कलम ३(२५),महा.पो.अधि.कलम ३७(१)१३५ मधील पाहीजे आरोपी बारक्या उर्फ प्रमोद पारसे हा पी.एम.पी.एम.एल. बस स्टॉप, स्वारगेट येथे मित्राची वाट पाहत थांबलेला आहे, बातमीवरुन त्याचा तेथे जावुन शोध घेतला असता तो मिळून आला व त्यांचेकडे ०२ गावठी पिस्टल व ०४ जिवंत काडतुसे मिळुन आली. म्हणुन त्यास ताब्यात घेवुन,त्याच्यावर स्वारगेट पो.स्टे. गु.र.नं. १६६८/२०२०, भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५),७(२५), ),महा.पो.अधि.कलम ३७(१)(३)(४)१३५ दाखल करण्यात आला. त्याच्याकडे तपास करता,त्याने गुन्ह्यातील गावठी पिस्टल व काडतुसे असे मिळुन एकुण १३ गावठी पिस्टल व जिवंत काडतुसे हे राजु जाधव,वय-२० वर्षे,रा. माणगाव,ता.हवेली,जि.पुणे याचे सोबत बुलढाणा येथे जावुन इसम बल्लुसिंग शिकलीगर,रा.निमखेडी,जि.बुलढाणा यांचेकडुन विकत आणल्याचे सांगितले. त्यावरुन आरोपी राजु जाधव याला पकडून त्याचेकडून ०५ गावठी पिस्टल व १५ जिवंत काडतुसे व बल्लुसिंग शिकलीगर याला पकडुन त्याचेकडुन ०१ गावठी पिस्टल व ०४ जिवंत काडतुसे हस्तगत केले आहे. आरोपी प्रमोद पारसे व राजु जाधव यांनी त्यांचे ओळखीचा लादेन उर्फ सोहेल मोदीन आसंगी,रा.टेल्कोकॉलनी,कात्रज, यास ०४ गावठी पिस्टल विकलेबाबत सांगितल्याने त्याचा शोध घेवुन,त्यांचे ताब्यातुन ०३ पिस्टल व ०८ जिवंत काडतुसे जप्त करुन त्याचे विरुद्ध स्वारगेट पो.स्टे गु.र.नं.१६७०/२०२० भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५),७(२५), महा.पो. अधि.कलम ३७(१)(३)(४)सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन,त्याची चौकशी करता, त्याने एक गावठी पिस्टल संदिप धुमाळ यास दिल्याचे सांगीतले व संदिप धुमाळ हा वेल्हा पो.स्टे. पुणे ग्रामीण मधील गुन्हयात अटक असुन दाखल गुन्ह्यात सदर पिस्टल जप्त असल्याचे समजले.

अशा प्रकारे वरील आरोपींकडून एकुण ११ पिस्टल व ३१ जिवंतकाडतुसे असा एकुण ४,५५,५००/- रु किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,श्री.अमिताभ गुप्ता सो, मा.अप्पर पोलीस आयुक्त,(पश्चिम प्रा.वि.) श्री.संजय शिंदे सो. मा.पोलीस उप आयुक्त,परि-०२, श्री.सागर पाटील. सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग, श्री.सर्जेराव बाबर सो.यांचे सुचनेनुसार व मार्गदर्शनाखाली वपोनिरी.श्री.ब्रम्हानंद नाईकवाडी, तपास पथकाचे पोउपनिरी.श्री.सुरेश जायभाय, पोहवा.महेंद्र जगताप, पंढरीनाथ शिंदे, अरुण पाटील, रामचंद्र गुरव, पोनाविजय कुंभार, विजय खोमणे, महेश बारवकर, पोशि.ज्ञाना बडे, मनोज भोकरे, सचिन दळवी, अमित शिंदे, वैभव शितकाल, महेश कांटे, भुषण उंडे, बाबासाहेब शिंदे, शंकर गायकवाड यांचे पथकाने केली आहे.

गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उप निरीक्षक श्री.सुरेश जायभाय, स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे शहर करीत आहेत.


पोलीस आयुक्तालय पुणे शहर
स्वारगेट पोलीस स्टेशन